सर्वोत्तम संस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-422222

दूरध्वनी : 0253-2230580, 2230734, 2230229, 2230024, 25, 26 फॅक्स : 2231716

संकेतस्थळ : http://ycmou.digitaluniversity.ac e-mail : nondani@ycmou.digitaluniversity.ac

ज्ञानगंगा घरोघरी

**परीक्षा व नोंदणी विभाग**

जा.क्र. : पनिका/नोंदणी/2017/ दिनांक : 25.06.2017.

## शैक्षणिक सत्र 2017-18 साठी आरक्षण प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी प्रवेश पध्दती

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांना प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या आरक्षण प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष 2017-18 साठी ऑनलाईन प्रवेश करण्यासाठी पुढील कार्यपध्दती वापरावयाची आहे.

महाराष्ट्र शासनाकडून मान्यता मिळालेल्या ह्या विद्यापीठातील खालील शिक्षणक्रमांना निश्चित केलेल्या आरक्षण प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी सदरची शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक सत्र 2017-18 पासून लागू करण्यात येत आहे.

**शैक्षणिक सत्र 2017-18 साठी शिष्यवृत्ती देय असलेल्या शिक्षणक्रमांची सूची**

| No | Name of the Programme | Level | Schools | Granted | Non-Granted | Eligible for SC | Eligible for OBC/SBC/VJ/NT | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Advance Diploma in Computing | Diploma | Computer | Yes | Yes | Yes | No | |
| 2. | Diploma in Computer Applications | Diploma | Computer | Yes | Yes | Yes | No | |
| 3. | Diploma in Electrician & Domestic Application Maintenance | Diploma | Continuing | Yes | Yes | Yes | No | |
| 4. | Bachelor of Computer Applications | Degree | Computer | Yes | Yes | Yes | No | |
| 5. | Bachelor of Arts | Degree | Humanities | Yes | Yes | Yes | Yes | |
| 6. | Bachelor of Library Information Science | Degree | Humanities | Yes | Yes | Yes | Yes | |
| 7. | Bachelor of Commerce | Degree | Commerce | Yes | Yes | Yes | Yes | |
| 8. | Bachelor of Science | Degree | Sci& Tech | Yes | Yes | Yes | Yes | |
| 9. | Master in Commerce | Post Graduate | Commerce | Yes | Yes | Yes | Yes | |
| 10 | Master of Science in Environmental Science | Post Graduate | Sci& Tech | Yes | Yes | Yes | Yes | |
| 11. | Master of Library and Information Science | Post Graduate | Humanities | Yes | Yes | Yes | No | |
| 12. | Master of Business Administration | Post Graduate | Commerce | Yes | Yes | Yes | No | |

Yes - शिष्यवृत्तीसाठी लागू आहे. No - शिष्यवृत्तीसाठी लागू नाही.

1. प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रथमतः http://ycmou.digitaluniversity.ac या संकेतस्थळाला भेट द्यावी. ह्या संकेतस्थळावरील आरक्षण प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी प्रवेश पध्दती/शिष्यवृत्तीबाबचे नोटीफिकेशन प्रथमतः वाचून घ्यावे.
2. ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश घेताना विद्यापीठ शुल्कात सूट घ्यावयाची असेल अशा सर्व विद्यार्थ्यांना उपरोक्त यादीतील शिक्षणक्रम शुल्क सूटबाबतची प्रस्तुत कार्यपध्दती लागू असेल.
3. विद्यार्थ्यांनी आपला ऑनलाईन प्रवेश अर्ज व्यवस्थित विद्यार्थ्यांच्या पोर्टलवरून भरावयाचा आहे. सदरचा अर्ज भरताना आपल्या प्रवर्गाशी संबंधित खालील तक्त्याप्रमाणे कागदपत्रे अपलोड करावयाची आहेत.

| नं. | प्रवर्ग | प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | अनुसूचित जाती (एससी) | जातीचा दाखला/ जात वैधता प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला (पालकाचे उत्पन्न मर्यादा रूपये 2 लाख पर्यंत), आधार कार्ड, आवश्यक ती शैक्षणिक पात्रता कागदपत्रे. | पालकाचे उत्पन्न रूपये 2 लाख पर्यंत असणाऱ्या विद्यार्थ्यांना संपूर्णपणे विद्यापीठ प्रवेश शुल्कात सूट असेल. उर्वरितांना संपूर्ण फी भरावी लागेल. |
| 2 | इतर मागासवर्गीय जाती (ओबीसी) | जातीचा दाखला/जात वैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलियर दाखला (वैध कालावधी), आधार कार्ड, आवश्यक ती शैक्षणिक पात्रता कागदपत्रे. | एकूण प्रवेश शुल्कातील ट्युशन (शिक्षण) शुल्कात 50 टक्के सूट व उर्वरित शुल्क भरावे लागेल. |
| 3 | विमुक्त जाती व भटक्या जमाती (व्हीजे(ए) – एनटी-बी/सी/डी) | जातीचा दाखला/ जात वैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलियर दाखला (वैध कालावधी), आधार कार्ड, आवश्यक ती शैक्षणिक पात्रता कागदपत्रे. | फक्त ट्युशन (शिक्षण) शुल्कात सूट असून उर्वरित सर्व शुल्क भरावे लागेल. |
| 4 | विशेष मागास प्रवर्ग जाती (एसबीसी) | जातीचा दाखला/ जात वैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलियर दाखला (वैध कालावधी), आधार कार्ड, आवश्यक ती शैक्षणिक पात्रता कागदपत्रे. | फक्त ट्युशन (शिक्षण) शुल्कात सूट असून उर्वरित सर्व शुल्क भरावे लागेल. |

उपरोक्त तक्त्यातील कागदपत्रे अपलोड करताना पीडीएफ फाईलचा वापर करू नये, त्याऐवजी जेपीजी फाईल्सचा वापर करावा. ऑनलाईनला योग्य त्या ठिकाणी दर्शविलेल्या साईजमध्येच अपलोड करावेत.

4. ऑनलाईनला प्रवेश अर्जातील सर्व माहिती भरून झाल्यानंतर **आपला ऑनलाईन प्रोव्हिजनल प्रवेश अर्ज ह्या शेवटच्या प्रिंट टॅबमधून** प्रिंट काढून त्यासोबत अपलोड केलेली सर्व कागदपत्रे साक्षांकित करून आपण निवडलेल्या अभ्यासकेंद्रावरील केंद्रसंयोजक यांच्याकडून **ऑनलाईन अॅप्रुव्ह (रिकमंडेड/नॉट रिकमंडेड) करून घ्यावयाचा आहे**. त्यानंतरच आपला प्रवेश अर्ज ऑनलाईनला शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी म्हणूनग्राह्य समजण्यात येईल.
5. अभ्यासकेंद्र संयोजकांकडून आपला अर्ज काही त्रुटींअभावी अथवा अपूर्ण कागदपत्रांअभावी नाकारण्यात आला किंवा आपणाकडून चुकीची माहिती ऑनलाईनला भरली गेल्यास सदरचा **अर्ज रद्द (नॉन रिकमंडेड)** समजण्यात येईल, त्यानंतर आपण पुन्हा **नव्याने ऑनलाईन अर्ज** (दुसरा अर्ज नवीन युजर आयडी तयार करून) भरावयाचा आहे.
6. आरक्षण प्रवर्गाचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश अर्जासोबत शैक्षणिक पात्रतेचे कागदपत्रे, आधारकार्ड, जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलिअर (वैध कालावधीचे) दाखला इत्यादींच्या मूळ कागदपत्राच्या प्रती आणि साक्षांकित प्रतीसह आपल्या अभ्यासकेंद्रावरील

केंद्रसंयोजकाकडून तपासून घ्यावयाच्या आहेत. अर्ज तपासून झाल्यानंतर आपल्या अर्जाची एक प्रत अभ्यासकेंद्रावर जमा करावयाची आहे. हे फक्त विद्यापीठात फ्रेश (नव्याने) प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लागू असेल.

7. विद्यार्थ्याने आपली ऑनलाईन प्रवेशाची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर आपला प्रवेश अर्ज अभ्यासकेंद्र संयोजकांनी **अप्रुव्ह (रिकमंडेड)** केल्यानंतर लगेचच शिष्यवृत्तीबाबतच्या समाजकल्याण विभागाच्या वेबसाईटवर जाऊन स्कॉलरशीपसाठी ऑनलाईन अर्ज अभ्यासकेंद्रामार्फत (अभ्यासकेंद्राचा कोड वापरून) भरावयाचा आहे. शिष्यवृत्ती अर्जाची प्रिंट घेऊन त्यासोबत शाळा सोडल्याचा दाखला, दहावी पासचे प्रमाणपत्र, जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र, उत्पन्न दाखला/नॉन क्रिमिलिअर दाखला (वैध कालावधी), आधार कार्ड, बँक पासबुक इत्यादींच्या साक्षांकित प्रतीसह अभ्यासकेंद्राकडे सादर करावयाचा आहे. **आपल्या ऑनलाईन प्रवेश अर्जासोबत ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज व उपरोक्त यादीतील कागदपत्रांसह** अभ्यासकेंद्रावर जमा करावयाची आहे.
8. जे विद्यार्थी यापूर्वी विद्यापीठाच्या पोर्टलवर प्रवेशित असतील म्हणजेच 16 **अंकी कायमनोंदणी क्रमांक** असणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रवेश अभ्यासकेंद्राकडून **रिजेक्ट (नॉट रिकमंडेड)** करण्यात आला तर त्याच कायमनोंदणी क्रमांकाने तो दुरूस्त (एडीट ऑपशनमधून) करून त्याच लॉगीनने नियमित शिष्यवृत्तीव्यतिरिक्त प्रवेश करू शकतो.
9. अभ्यासकेंद्र केंद्रसंयोजक यांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज तपासून घ्यावा. तसेच त्यासोबतच्या साक्षांकित प्रती व मूळ कागदपत्रे तपासून आरक्षण प्रवर्गातील प्रवेश बरोबर असल्याची खात्री करून घ्यावी आणि http:// http://ycmouoa.digitaluniversity.ac/AdminLogin ह्या लिंकवरून **अभ्यासकेंद्राच्या लॉगीनला** असलेल्या Application Recommendation ह्या आज्ञेवरून विद्यापीठास सॉफ्टवेअरमार्फत (Electronically) संबंधित विद्यार्थ्याचा प्रवेश **अँप्रुव्ह (रिकमंडेड/नॉट रिकमंडेड) करावयाचा आहे**. नॉन रिकमंड केल्यास त्याखालील बॉक्समध्ये त्रुटीचा शेरा टाकण्यात यावा आणि प्रवेश अर्ज तपासून झाल्यानंतर विद्यार्थ्याने आपली मूळ कागदपत्रे परत घ्यावयाची आहे.
10. अभ्यासकेंद्राने अँप्रुव्ह (पात्र) केल्याशिवाय आपला प्रवेश कायम होऊ शकणार नाही. त्यासाठी आपणांस अभ्यासकेंद्रावर जाणे आवश्यक आहे. तसेच **ऑनलाईन प्रवेश अर्जासोबत आपला शिष्यवृत्ती अर्ज भरून अभ्यासकेंद्रावर जमा केल्याशिवाय आपला ऑनलाईन प्रवेश अर्ज ग्राह्य समजण्यात येणार नाही.**
11. अभ्यासकेंद्रावरून आरक्षणाबाबत अँप्रुव्हल दिल्यानंतर विद्यापीठामध्ये संबंधिताची अंतिम प्रवेश पात्रता निश्चित करण्यात येणार आहे. त्यामुळे सर्व कागदपत्रे वरील तक्त्याप्रमाणे काळजीपूर्वक अपलोड करणे आवश्यक आहेत.
12. **फी माफीत आरक्षण प्रवर्गातील विद्यार्थ्याचा चुकीचा प्रवेश पात्र झाल्यास त्यास संबंधित अभ्यासकेंद्र जबाबदार राहील, त्यामुळे कागदपत्रांची शहनिशा करूनच पात्रता करावी.**
13. आरक्षण प्रवर्गातील विद्यार्थ्याने प्रवेश अर्जासोबत सोबतचे नोकरीत कार्यरत नसल्याचे हमी पत्र जोडणे आवश्यक आहे.
14. विद्याशाखानिहाय, शिक्षणक्रमनिहाय आरक्षणाचा सोबतचा तक्ता पहावा.

**प्रा.(डॉ.) अर्जुन घाटुळे,**
***परीक्षा नियंत्रक***

प्रत माहितीसाठी - 1. मा.कुलगुरू,यचममुविद्यापीठ,नाशिक

## नोकरी/सेवेत कार्यरत नसल्याचे हमी पत्र

मी ................................................................ प्रवेश अर्ज क्रमांक .......................... कायमनोंदणी क्रमांक .................................................... यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक अभ्यासकेंद्र ............................................................... केंद्र सांकेतांक ...................... ह्या अभ्यासकेंद्रावर .................................. ह्या शिक्षणक्रमासाठी शैक्षणिक सत्र 2017-18 साठी प्रवेश करीत आहे.

याचबरोबर मी आपल्या विद्यापीठामार्फत आरक्षण प्रवर्गातील शिष्यवृत्तीसाठी समाजकल्याण विभागामार्फत अर्ज करीत आहे. माझ्या पालकाचे उत्पन्न रूपये 2 लाखाच्या आत आहे. ह्याबाबत मी अशी हमी देतो की, मी कोठेही शासकीय/ निमशासकीय/ खाजगी नोकरीत अथवा सेवेत कार्यरत नाही, असे आढळून आल्यास **मी शिष्यवृत्तीस अपात्र होईल याची मला खात्री आहे.**

स्थळ - . ..................................

दिनांक ....../......../2017.

विद्यार्थ्याचे नाव ................................................ ..............................................

स्वाक्षरी - ...................................................

क्र.सकस/शिक्षण/भासशि/राष्ट्रभाषा/
का-४/११.१२ / १०९६
समाज कल्याण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य पुणे १
दिनांक ५/९/२०११

प्रति,
सर्व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी

विषय :- १) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक
२) इंदीरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ नवी दिल्ली
३) राष्ट्रभाषा प्रचार समिती ज्ञान मंडळ वर्धा
या संस्थेत दुरस्थ शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती मंजूरीबाबत.

संदर्भ :
१. शासन निर्णय क्र.ईबीसी-२००८/प्र.क्र.३०/मावक-२, दिनांक ५/१/२००५
२. विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, वाशिम यांचे पत्र क्र.विजिसकअ/वा भासशि/जि-३/२६८/११-१२, दिनांक २३/६/२०११
३. विभागीय समाज कल्याण अधिकारी, अमरावती यांचे पत्र क्र.विसकअ/अम/भासशि/यचमुवि/३१००/११.१२, दि.५/८/२०११
४. संचालक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र.एससीएस/१००/२०११, दिनांक १/८/२०११
५. सहसंचालक, राष्ट्रभाषा प्रचार समिती ज्ञान मंडळ वर्धा यांचे पत्र दि.१०/८/२०११
६. केंद्र शासनाकडील पत्र क्र.११०१७/०१/२००८-एससीडी-५, दि.३१/१२/२०१०.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, दुरस्थ शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शासन निर्णय क्र.इबीसी-२००४/प्र.क्र.३०/मावक-२ दिनांक ५/१/२००५ सोबत केंद्र शासनाचे पत्र क्र.११०१७/७/२००२-एससीडी-५ दिनांक २८/१/२००४ अन्वये दिलेल्या नियमावलीतील परिशिष्ट-३ मधील नियम क्र.९ नुसार देय असल्याने ज्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये दोन लाखाचे आत आहे अशा दुरस्थ शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजने अंतर्गत शिष्यवृत्ती देय आहे. SC.

या संचालनालयाचे पत्र क्र.सकस/शिक्षण/भासशि/मुक्त विद्यापीठ/शिष्यवृत्ती/०९/१०/का-४/१२८०, दिनांक ५/१२/२००९ नुसार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणेबाबतची कार्यवाही करणेबाबत यापूर्वीच कळविले आहे.

सबब संबंधित विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी उपरोक्त विनाअनुदानित संस्थेमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून भारत सरकार शिष्यवृत्ती मंजूरीबाबत कार्यवाही करावी.

१. संबंधित संस्था शासन मान्य व संस्थेमधील अभ्यासक्रमास शासनाची मान्यता असणे बंधनकारक राहील.
२. संबंधित संस्थेत अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्याने मुळ टी.सी. द्वारेच प्रवेश घेणे आवश्यक आहे.
३. संस्थे अंतर्गत सुरु असणाऱ्या प्रत्येक अभ्यासक्रमासाठी ३५ घड्याळी तासांचे नियोजन असावे. त्यानुसार, सहा महिन्यातील एका सत्रासाठी विद्यार्थ्यांस किमान ७-८ तासांचे अभ्यासकार्य पूर्ण करण्याचे बंधनकारक राहील.
४. विद्यापीठाचे नियमानुसार अभ्यासकार्य हे तासिका व प्रात्यक्षिक स्वरुपाचे असून ते विद्यार्थ्यांनी अभ्यास केंद्रावरच जाऊन पूर्ण करणे बंधनकारक आहे.
५. संगणक विद्याशाखेच्या बी.एस.सी. (सी.सी.एस.) बी.सी.ए.,डी.ए.सी. इत्यादी शिक्षणक्रमातील प्रत्येक अभ्यासक्रम ४ श्रेयांकांचा असून यातील एका अभ्यासक्रमासाठी किमान १४० घड्याळी तासांचे अभ्यासकार्य विद्यार्थ्यांकडून आवश्यक आहे.
६. विद्यार्थ्यांची अभ्यासक्रमासाठी ७५% उपस्थिती आवश्यक राहील.

उपरोक्त अटी व शर्तींचे पूर्ततेबाबत संबंधित प्राचार्यांची लेखी संमती प्रस्तावासोबत घेतल्याची खात्री करुनच विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी पात्र असलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती मंजूरीबाबत कार्यवाही करावी.

संचालक, समाज कल्याण
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहिती व कार्यवाहीस्तव
१. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञान गंगोत्री, गंगापूर धरणा जवळ, नाशिक
२. इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली
३. राष्ट्रभाषा प्रचार समिती ज्ञान मंडळ वर्धा जि. वर्धा
४. सर्व विभागीय समाज कल्याण अधिकारी